**॥ श्री ॥**

**॥ बाबा ॥**

दाट अंधारातून कुणी आलं
प्राणज्योत तेजवून गेलं
तेल वंगणही त्यांनी दिलं
तुला निर्धास्त त्यांनी बनवले
आता तुझा कार्यभाग बघ ॥धृ॥

आहेत सगळी नाती फोल
प्रेम द्वेष दिखावूपणा
एकटाच येईल माझ्यासंगे
जो आहे मुळी ईश्वरनिष्ठ
नाही त्याला मी चे भान
तो तर माझ्यात विलीन
ज्योत ज्योतीला मिळेल
प्रखर त्याचा प्रकाश ॥1॥

नाही समजत धूनही दिल्या
नीत श्रवणा माध्यमे गायिल्या
कधी केला का विचार क्षणभर
कशा आल्या धून कशासाठी त्या
नाही अर्थ लाविला
व्यवहारी जीवनात
तू तर कोरडा पाषाण
नाही स्वीकार स्वीकार ॥2॥

★★★★★